दै. देशोन्नती दि. १४।१०।१९.

देशोन्नती दि. १४।१०।१९.

# देशी कट्ट्यासह आरोपी पोलिसांच्या ताब्यात

## 'डिवायएसपी' धनंजय पाटील यांच्या पथकाची कारवाई



उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

प्रतिनिधी/ १३ ऑक्टोबर

**नांदेड :** जुन्या नांदेडातील खुदबेनगर येथील एका आरोपीस ताब्यात घेवून त्याच्याकडून देशीकट्टा जप्त करण्यात आला.

खुदबेनगर येथील एका तरुणाकडे हत्यार असून तो रोशन फंक्शन हॉल येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरुन उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रदिप काकडे, पोलिस उपनिरीक्षक गिते, शंकर नलबे, मोहमद गौस, हबीब चाऊस, शेख खाजा, मामुलवार आदींनी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी सदर ठिकाणी जावून आरोपी सय्यद अलताफ सय्यद रज्जाक यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे देशी कट्टा आढळून आला. या प्रकरणी वृत्त लिहिपर्यंत आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.